ePaper
|| वर्ष - 6 | अंक - 261 || UDYAM-MH-26-0158827 ||
महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | बुधवार, दि. 4 जानेवारी 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# राज्यातील वीज कर्मचारी 72 तासांच्या संपावर!




## आतील पानांत

- छत्रपती संभाजी महाराजांबाबतचा वाद निरर्थक - शरद पवार
- महावितरणचे शटडाऊन?
- कोरोनाचं संकट, देशात अलर्ट

# ‘लक्ष्मण’ पर्वाचा सूर्यास्त!

## लोकनेते लक्ष्मण जगताप अनंतात विलीन : शासकीय इतमामात अखेरचा निरोप

**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकारणात सुमारे ३५ वर्षे अधिराज्य गाजवणारे लोकनेते आमदार लक्ष्मण जगताप यांना शासकीय इतमामात अखेरचा निरोप देण्यात आला. पिंपळे गुरव येथे हजारो “भाऊप्रेमी” उपस्थितीत पिंपरी-चिंचवडच्या स्वाभिमानासाठी लढणारा भूमिपुत्र अनंतात विसावला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी जगताप कुटुंबियांचे सांत्वन केले आणि आपल्या लढवय्या सहकाऱ्याला अलविदा केले.**



भाजपाचे जेष्ठ नेते, माजी शहराध्यक्ष आणि विद्यमान आमदार लक्ष्मण पाडुरंग जगताप (वय ५९) यांचे बाणेर येथील ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये मंगळवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास दीर्घ आजाराने निधन झाले. पिंपळे गुरव येथील जगताप कुटुंबियांच्या शेतात आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. भजन करीत त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली. जगताप यांच्या निधनाने शहरावर शोककळा पसरली आहे.

यावेळी विधान परिषद सभापती डॉ. निलम गोऱ्हे, राज्याचे मंत्री अतुल सावे, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, आमदार महेश लांडगे, अण्णा बनसोडे, खासदार श्रीनिवास पाटील, माजी आमदार विलास लांडे, जिल्हाधिकारी राजेश देशमुख, पीएमआरडीए मुख कार्यकारी अधिकारी राहुल महिवाल, महापालिका आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त विनयकुमर चौबे आदी उपस्थित होते. शहराच्या राजकारणातील ‘बाहुबली’ शहरातील राजकारणात गेली ३५ वर्षे जगताप यांचे वलय होते. चार वेळा नगरसेवक, एक वेळा विधानपरिषद सदस्य, तीन वेळा चिंचवडचे आमदार राहिलेले जगताप यांनी पुणे जिल्ह्यातील राजकारणात स्थान निर्माण केले होते. सुरूवातीला २०१४ पर्यंत राष्ट्रवादीचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आणि २०१४ नंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खंदे समर्थक म्हणून भूमिका बजावली होती. भाजपाच्या शहराध्यक्षपदाची सूत्र स्विकारून पिंपरी-चिंचवड महापालिकेत २०१७ मध्ये भाजपाची एकहाती सत्ता आणण्यात महत्वाची भूमिका बजावली होती. तसेच, समाजकारण, राजकारण, सहकार, शिक्षण, बांधकाम व्यवसायात त्यांनी योगदान दिले. त्यांनी महापालिकेत नगरसेवक, महापौर, स्थायी समिती अध्यक्ष, राष्ट्रवादीचे अध्यक्ष, विधानपरिषद आमदार, एक वेळा अपक्ष आमदार, भाजपाचे शहराध्यक्ष आणि दोन वेळा भाजपा आमदार म्हणून काम केले होते. २०१४ पासून पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाला यशस्वी वाटचाल करता आली. त्यामध्ये जगताप यांचा करिष्मा मोठा आहे.

महाराष्ट्र विधानसभेतील आमदार लक्ष्मण जगताप जी यांच्या निधनाने दुःख झाले .जनकल्याणासाठी तसेच पुणे आणि परिसराच्या विकासासाठी त्यांनी मोठे योगदान दिले.त्यांचे कुटुंबीय आणि समर्थकांप्रती माझ्या शोक संवेदना. ओम शांती.

**-नरेंद्र मोदी,** पंतप्रधान.

चिंचवड मतदार संघाचे आमदार लक्ष्मण जगताप यांचे प्रदीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. सर्वसमान्यांच्या प्रश्नांची जाणीव असलेले प्रभावी नेतृत्व आज आपल्यातून हरपले. जगताप कुटुंबीयांच्या दुःखात मी सहसंवेदना व्यक्त करतो.

**शरद पवार,** अध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस.

“आमदार जगताप यांनी स्वकर्तृत्वाने कारकीर्द घडवली. पिंपरी -चिंचवडचा विकास हा त्यांचा ध्यास होता. नगरसेवक, स्थायी समिती अध्यक्ष, महापौर म्हणून त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला. विधिमंडळातही ते आपला मतदारसंघ आणि परिसरातील समस्या, अडचणी यासाठी हिरीरीने काम करत असत. लोकहिताच्या दृष्टीने अनेकदा त्यांनी संघर्षशील भूमिका घेतली. आजारपणाशीही त्यांचा प्रदीर्घ लढा सुरू होता. यातही त्यांनी आपले कर्तव्य बजावताना कुचराई केली नाही. पण नियतीला हे मान्य नसावे आणि आमदार जगताप यांना काळाने हिरावून नेले. हा त्यांच्या परिवारासह, कार्यकर्ते, चाहत्यांसाठी मोठा आघात आहे.”

**एकनाथ शिंदे,** मुख्यमंत्री.



# शोकसंदेश :

लक्ष्मणभाऊंची पोकळी कधीच भरून निघू शकत नाही. ही फार मोठी हानी आहे. या दुःखाच्या प्रसंगात आम्ही सर्वजण त्यांच्या सोबत आहोत. गेल्याच आठवड्यात मुक्ताताई टिळक आपल्यातून निघून गेल्या आणि आज लक्ष्मणभाऊ. पक्षाची मोठी हानी त्यांच्या जाण्याने झाली आहे. महापौर आणि आमदार म्हणून त्यांनी विकासाच्या प्रक्रियेत मोठे योगदान दिले.

**- देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

चिंचवडचे आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानं जनतेच्या प्रश्नासाठी तळमळीनं काम करणारा झुंजार लोकप्रतिनिधी, जवळचा सहकारी आज गमावला आहे. राजकीय, सामाजिक जीवनात त्यांनी केलेलं काम कायम स्मरणात राहील. पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासात त्यांचं मोलाचं योगदान होतं.भावपूर्ण श्रद्धांजली!

**-अजित पवार,** विरोधी पक्षनेता

"गेले अनेक दिवस लक्ष्मण जगताप कर्करोगावर उपचार घेत होते. दीर्घ आजाराने त्यांचे आज निधन झाले. अतिशय कमी वयात नगरसेवक ते आमदार अशी त्यांची राजकीय कारकिर्द राहिली. महापालिकेत नगरसेवक, स्थायी समिती अध्यक्ष, शहराचे महापौरपद त्यांनी भूषविले. विधानपरिषद आणि विधानसभेचेही ते आमदार झाले. लक्ष्मण जगताप हे शहराचे महापौर असताना मी महापालिका स्थायी समितीचा अध्यक्ष होतो. काही काळापुरते राजकीय मतभेद असतील. परंतु, पिंपरी-चिंचवड शहराच्या जडणघडणीत, विकासात त्यांचे मोठे योगदान होते. त्यांच्या जाण्याने शहराची मोठी हानी झाली आहे.

**- श्रीरंग बारणे,** खासदार.

पिंपरी-चिंचवडचे लोकप्रिय आणि लढवय्ये आ. लक्ष्मण जगताप यांचं अकाली निधन भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्यासाठी वेदनादायी आहे. मुक्ताताईंनंतर लक्ष्मणभाऊंच्या रुपात आणखी एक समर्पित नेता आपण गमावला आहे. प्रकृती साथ देत नसतानाही पक्षाची आवश्यकता लक्षात घेऊन त्यासाठी मत द्यायला येणारे लक्ष्मणभाऊ यांची समर्पणाची भावना आठवून आजही मन भरून येतं. त्यांची पक्षनिष्ठा आणि त्यांच्या कुटुंबियांचा त्याग असाधारण आहे.

**- चंद्रकांत पाटील,** पालकमंत्री.



पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकारणात तब्बल ३५ वर्षे आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटवणाऱ्या भाऊंनी शहराच्या यशस्वी वाटचालीत मोलाचे योगदान दिले. शहराच्या सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्राची कधीही भरुन न येणारी हानी आज झाली. तमाम पिंपरी-चिंचवडकर जगताप कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहेत. पिंपरी -चिंचवडचा विकास हा त्यांचा ध्यास होता. नगरसेवक, स्थायी समिती अध्यक्ष, महापौर म्हणून त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला. विधिमंडळातही ते आपला मतदारसंघ आणि परिसरातील समस्या, अडचणी यासाठी हिरीरीने काम करत असत. लोकहिताच्या दृष्टीने अनेकदा त्यांनी संघर्षशील भूमिका घेतली.

**-महेश लांडगे,** आमदार

भाऊंनी आपल्या सामाजिक आणि राजकीय जिवनात काम करताना पिंपरी-चिंचवड शहराच्या यशस्वी वाटचालीत भरीव आणि मोलाचे योगदान दिले. जनतेच्या प्रश्नांसाठी तळमळीने काम करणारा ध्येयवादी लोकप्रतिनिधी आज आपण गमावला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करताना त्यांनी शहराच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. भाऊंनी केलेले काम हे शहरवासियांच्या कायम स्मरणात राहिल. ध्येयवादी आणि संवेदनशील नेत्याच्या निधनाने पिंपरी-चिंचवड शहराची अपरिमित हानी झाली आहे.

**-अजित गव्हाणे,** शहराध्यक्ष, राष्ट्रवादी

माझ्या सारख्या असंख्य पिंपरी चिंचवड नागरिकांच्या मनात आपल्या कार्य कर्तृत्वाने जागा निर्माण करणारे अस हे व्यक्तिमत्व आपल्या मधून निघून गेलेले आहे त्यामुळे पिंपरी चिंचवड शहराचे कधी ही न भरून येणारे नुकसान झाले आहे. राजकरणा पलिकडची मैत्री जपणारा हा नेता सदैव स्मरणात राहील.

**-अण्णा बनसोडे,** आमदार.

मी आणि लक्ष्मण जगताप आम्ही दोघांनी महापालिकेत, विधानसभेत एकत्र काम केले. आमची अतिशय जवळची मैत्री होती. त्यांनी नात्याच्या पलिकडे जावून मैत्री जपली. शहरात वेगळे अस्तित्व निर्माण करण्याचे काम लक्ष्मणभाऊंनी केले. नागरिकांचे काम झाले पाहिजे, यासाठी त्यांची सातत्याने तळमळ होती. दूरदृष्टी ठेवून काम करणारा नेता हरपला. आमच्या तीन पिढ्यांचे जगताप कुटुंबियांशी नाते आहे. नात्यापेक्षा मैत्री जपणारा मोठा सहकारी गेला आहे. त्यांच्या निधनामुळे निर्माण झालेली पोकळी कधीच भरुन येणार नाही. त्यांच्या जाण्याने शहराचे फार मोठे नुकसान, हानी झाली आहे.

**- विलास लांडे,** माजी आमदार.

"लक्ष्मणभाऊ, मी आणि विलास लांडे आम्ही तिघांनी महापालिका सभागृहात एकत्र काम केले. मी महापौर असताना ते नगरसेवक होते आणि ते महापौर असतानाही मी नगरसेवक होतो. 15 वर्षे आम्ही महापालिका सभागृहात सोबत होतो. एकोप्याने शहर विकासाचे निर्णय घेत होतो. भाऊंना विकासाची दूरदृष्टी होती. जीवाला जीव देणारा लक्ष्मणभाऊ माणूस होता".

**-संजोग वाघेरे,** माजी महापौर.



# स्वाभिमानी भूमिपूत्र काळाच्या पडद्याआड!

पिंपरी । महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड शहराच्या वाटचालीतील “लखलखता तारा” म्हणून ज्यांची ओळख अजरामर राहील, असे शहराचे नेते आदरणीय लक्ष्मण जगताप यांनी जगाचा निरोप घेतला. पिंपरी-चिंचवडच्या या स्वाभिमानी सुपुत्राची कारकीर्द पिढ्यानपिढ्या स्मरणात राहणार आहे.**



**राजकारण** करत असताना तत्वाशी नेहमी एकनिष्ठ राहायचे.आपला स्वाभिमान, बाणेदारपणा कायम राखायचा हे आदर्शवत राजकारण भाजपाचे माजी शहराध्यक्ष तथा आमदार लक्ष्मण जगताप यांनी कायम जपले आणि आम्हा नवोदितांना शिकवले. ज्यावेळी पिंपरी-चिंचवडकरांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न पुढे आला त्यावेळी त्यांनी पक्ष, राजकारण देखील झुगारले. अशा कर्तुत्व संपन्न आणि धगधगत्या नेतृत्वाला पिंपरी-चिंचवड शहर आज मुकले आहे.

सुमारे ३५ वर्षे पिंपरी-चिंचवडच्या राजकारणावर आमदार जगताप यांनी एक वेगळा दबदबा निर्माण केला. गेल्या २० वर्षात शहराच्या निर्णय प्रक्रियेत त्याचा ‘शब्द’ म्हणजे प्रमाण होता. पिंपरी-चिंचवडमधील सर्वसामान्य नागरिकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेला अनधिकृत बांधकाम, शास्तीकर, प्राधिकरणाचा परतावा अशा मुद्यांवर आमदार जगताप यांनी तत्कालीन मातब्बर पक्षातून




**प्रासंगिक**

**महेश लांडगे**

शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. कारण, शहरातील प्रश्न सुटत नसतील, तर अशा राजकारणाचा उपयोग काय? अशी सडेतोड भूमिका घेणारे आमदार जगताप २०१४ पासून भारतीय जनता पार्टीचे ‘डिसिझन मेकर’ नेते बनले होते. मी पहिल्यांदा आमदार झाल्यानंतर सभागृहात कामकाज कसे करावे? विषय कसे मांडावे? लक्षवेधी कशी द्यावी? यांसारख्या छोट्या-छोट्या गोष्टी देखील त्यांनी शिकवल्या आहेत. आजाराशी झुंज सुरू असताना विधान परिषद आणि त्यानंतर राज्यसभा निवडणुकीत मतदान करण्यासाठी आमदार जगताप रुग्णवाहिकेतून मुंबई येथील विधान भवनात दाखल झाले आणि आपला मतदानाचा हक्क बजावला. “राष्ट्र प्रथम.. नंतर पक्ष आणि शेवटी मी...” हे भारतीय जनता पार्टीचे ब्रिद आमदार जगताप यांनी शेवटच्या श्वासापर्यंत जपले. संपूर्ण राज्यातील भाजपाच्या कार्यकर्त्यांना प्रेरणा राहील, असे कार्य उभा करणारे आमदार जगताप माझ्यासारख्या असंख्य भाजपा कार्यकर्त्यांचे आदरस्थान आहेत.निवडणुकीच्या काळात आमदार जगताप आणि मी म्हणजे भाजपाची ‘राम-लक्ष्मण’ची जोडी अशी घोषणा शहरात खूप लोकप्रिय झाली. पक्ष संघटनामध्ये भाऊंचा नेहमी आधार वाटत होता. आता हा ‘आधार’ हरपला आहे. पिंपरी-चिंचवडकरांच्या स्वाभिमानासाठी राजकीय लढा उभारणारा नेता काळाच्या पडद्याआड गेला आहे. ही पोकळी कधिही भरुन येणारी नाही. असा कर्तुत्वसंपन्न नेता पुन्हा होणे नाही.



## आमदार जगताप यांची कारकीर्द...

**लक्ष्मण** जगताप यांचा जन्म १५ फेब्रुवारी १९६३ रोजी झाला होता. शेती हा त्यांचा प्रमुख व्यवसाय राहिला. १९८६ मध्ये त्यांनी सर्वप्रथम पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक लढली होती. त्यानंतर २००६ पर्यंत सलग २१ वर्षे ते पिंपरी-चिंचवड महापालिकेचे नगरसेवक होते. १९९३ मध्ये त्यांनी महापालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्षपद भूषवले. २००० मध्ये ते महापौर बनले. २००२ मध्ये ते राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष झाले. त्यानंतर त्यांनी राज्याच्या राजकारणात जाण्याचा निर्णय घेत २००४ मध्ये पुणे जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची निवडणूक अपक्ष लढवली. त्यात ते विजयी झाले. २००८ मध्ये लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांची पुनर्रचना झाली. त्यात चिंचवड विधानसभा मतदारसंघ अस्तित्वात आला. २००९ मध्ये



झालेल्या विधानसभा निवडणुकीत चिंचवड मतदारसंघातून लक्ष्मण जगताप यांनी अपक्ष निवडणूक लढवली आणि विजय मिळवला. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी मावळ लोकसभा मतदारसंघात शेतकरी कामगार पक्ष आणि मनसेच्या पाठिंब्याने निवडणूक लढवली. त्यात त्यांचा पराभव झाला. त्यानंतर त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करून २०१४ मध्ये चिंचवड विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवून आमदार झाले. ते शहरातील भाजपचे पहिले आमदार ठरले. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत ते पुन्हा भाजपच्या तिकीटावर चिंचवड विधानसभा मतदारसंघातूनच निवडणुक लढले आणि शहरातील सलग तिसऱ्यांदा निवडून येणारे ते पहिले आमदार ठरले. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीचा अपवाद वगळता प्रत्येक निवडणुकीत पिंपरी-चिंचवडच्या मतदारांनी आमदार लक्ष्मण जगताप यांना भरभरून मतांनी विजयी केले.

# पवारांनी टोचले अजितदादांचे कान!

## धर्मवीर किंवा स्वराज्यरक्षक या भूमिकांवरून वाद करू नये

बारामती । महाईन्यूज । प्रतिनिधी।

छत्रपती संभाजी महाराजांप्रती आस्था आहे अशा काही लोकांना ते धर्मवीर आहेत असे वाटले आणि काहींना ते स्वराज्यरक्षक आहेत असे वाटले तरी त्या वरुन वाद करण्याचे काही कारण नाही, या भूमीचे रक्षण करण्यासाठी संभाजी महाराजांनी प्राणांचे बलिदान केलेले आहे, त्या मुळे धर्मवीर किंवा स्वराज्यरक्षक या भूमिकांवरुन वाद करु नये, अशी भूमिका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मांडली.

बारामतीत आज माध्यमांशी बोलतांना अजित पवार यांच्या संभाजी महाराजांच्या बाबतीतील



वक्तव्यानंतर उदभवलेल्या वादावर प्रश्न विचारला असता शरद पवार यांनी ही भूमिका मांडली. महाराजांचे या भूमीप्रती कार्य महत्वाचे आहे, इतर वाद करु नयेत असे ते म्हणाले.

महागाई, बेरोजगारी असे मुद्दे मागे पडत आहेत, ज्या मुळे लोक अस्वस्थ आहेत, अशा विषयाला बाजूला ठेवून लोकांचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न सरकारकडून होत आहेत.

### भाजप अध्यक्षांना चिमटे...

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी महाराष्ट्रात मिशन 45 ची घोषणा केली या वर विचारता पवार म्हणाले, मला खरतर आश्चर्य वाटल त्यांनी 48 ची घोषणा करायला हवी होती. त्यांच्या राज्यात निवडणूका झाल्या, सत्ता असूनही लोकांनी त्यांना सत्तेतून दूर केले. राज्याची केंद्राची सत्ता असताना ज्यांना निवडणूक जिंकता आली नाही, त्यांच्या वक्तव्याची नोंद किती गांभीर्याने घ्यावी याचा विचार करण्याची आवश्यकता नाही.

लव्हजिहाद प्रकरणी कायदे करण्याची मागणी होत आहे, पण कायदे करणार कोण....केंद्र व राज्यातही भाजपचेच सरकार आहे, कायदा करण्याची मागणी करण्यासाठी मोर्चे काढण्याची गरज काय आहे, सर्वांना विश्वासात घेऊन भाजपने कायदा करुन मोकळे व्हावे, असे ते म्हणाले.

नोटबंदीवर सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिलेला असल्याने त्यावर भाष्य करणे योग्य नाही, न्यायालयाने दिलेला निकाल आपल्याला मान्य करावा लागेल, इथून पुढच्या काळात त्याचे अर्थकारणावर झालेले परिणाम व वेगळी मते, नंतर पुढे येतील, असे ते म्हणाले.

## थोडक्यात

### युद्ध क्षेत्रात प्रथमच महिला अधिकाऱ्याची नियुक्ती

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

'ती'ने आतापर्यंत विमान चालविले... तिने प्रत्यक्षात युद्धभूमीवर जाऊन कर्तव्यही बजावले... आता तर तिने धाडसाचे शिखर गाठत थेट जगातील सर्वात उंच अशा युद्धभूमीला गवसणी घालत पुन्हा एकदा कर्तबगारी सिद्ध केली आहे. ही देदीप्यमान कामगिरी बजावली आहे कॅप्टन शिवा चौहान हिने. भारतीय सैन्यदलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवण्याचे काम तिने केले आहे. भारतीय सैन्यदलाच्या इतिहासात प्रथमच एका महिला अधिकाऱ्याची नियुक्ती 'ऑपरेशनल' कार्यासाठी सियाचीनच्या १५ हजार ६३२ फूट उंच ठिकाणी असलेल्या 'कुमार पोस्ट' येथे करण्यात आली आहे.

# रस्त्याच्या निविदेच्या दबावाची पालकमंत्र्यांकडे तक्रार!

## ■ चंद्रकांत पाटील : पुणे शहरातील प्रकल्पांचा आढावा

। पुणे महाईन्यूज । प्रतिनिधी।

पथ विभागाच्या ५३ कोटी रुपयांच्या निविदा प्रक्रियेत प्रचंड राजकीय हस्तक्षेप करून आपापल्या ठेकेदाराला काम मिळावे यासाठी आमदार, माजी सभागृहनेते, माजी नगरसेवकांच्या कुरघोड्या सुरू झालेल्या असताना याची तक्रार पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे करण्यात आलेली आहे. राजकीय दबाव आणि नियमबाह्य पद्धतीने ठेकेदाराला पात्र करण्यासाठी सुरू असलेला त्रास याची माहिती पालकमंत्र्यांना देण्यात आली. नियमानुसार निविदा मान्य करा, चुकीच्या पद्धतीने कोणी वागत असेल तर कारवाई करा असे आदेश प्रशासनाला दिले असल्याचे सूत्रांनी सांगितले.

चंद्रकांत पाटील यांनी पुणे



शहरातील प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी सोमवारी बैठक घेतली. यामध्ये कोथरूड परिसरातील नव्याने केले जाणारे डीपी रस्त्यांवर चर्चा झाली. तसेच पुढील काळात शहरात साडेतीनशे कोटी रुपये खर्च करून डांबरीकरणाची कामे केली जाणार असल्याबाबतही चर्चा झाली. त्यावेळी निविदा क्रमांक चारमध्ये राजकीय दबाव आणला जात असल्याचे पाटील यांना सांगण्यात आले. त्यांनी या सर्व निविदा प्रक्रियेची माहिती घेऊन नियमानुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करा. जर कोणा राजकीय दबाव आणून त्यात बदल करून घेत असेल तर त्याची तक्रार माझ्याकडे करा. त्यावर कारवाई केली जाईल, असे पाटील यांनी अधिकाऱ्यांना स्पष्टपणे सांगितले. दरम्यान, अधिकाऱ्यांनी या प्रकरणातील गोंधळ पाटील यांच्या कानावर घातलेला असताना काही राजकीय पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या पद्धतीने हा विषय मांडण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा काही उपयोग झाला नाही असेही सूत्रांनी सांगितले.

### अधिकाऱ्यांना शिवीगाळ

निविदा क्रमांक चारमध्ये मर्जीच्या ठेकेदाराची वर्णी लागावी यासाठी एका माजी नगरसेविकेच्या पतीने अधिकाऱ्याला शिवीगाळ केल्याचा प्रकारही काही दिवसांपूर्वी घडला आहे. त्यामुळे दबावात असलेल्या अधिकाऱ्यांनी काम करण्यास नकार दिल्याने आता या अधिकाऱ्याकडील काम काढून घेऊन दुसऱ्या अधिकाऱ्याकडे दिले आहे. तरीही या राजकीय दबाव कमी झालेला नाही.

### निविदा रद्द करण्याची काँग्रेसची मागणी

प्रशासनाने मोठ्या रकमेच्या निविदा काढल्याने त्यासाठी पात्र ठरणारे मोजकेच ठेकेदार शहरात आहेत. त्यामुळे रस्त्याच्या निविदांमध्ये योग्य स्पर्धा झालेली नाही. यात स्पर्धा झाली असती तर पुणेकरांचे किमान २५ टक्के रकमेची बचत झाली असती. ठेकेदारांनी पूर्वीच्या हॉटमिक्स प्लांटचे लोकेशन, वैध करारनामा, बीड कॅपेसिटी, खरे अनुभव जोडलेले नाहीत. महापालिका आयुक्तांनी सर्व ठेकेदारांच्या पात्रतेची खातरजमा स्वतःच्या पातळीवर केली तर यातील गैरव्यवहार समोर येईल, अशी मागणी काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी आयुक्तांकडे केली आहे.

# 12 दिवसांत भाजपने गमावले 2 आमदार



। चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

चिंचवड येथील भाजपचे आमदार लक्ष्मण जगताप यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. ते मागच्या बऱ्याच दिवसांपासून आजारी होते. तर भाजपने मागच्या १२ दिवसांत दोन आमदार गमावले आहेत.

पुण्यातील कसबा विधानसभा मतदारसंघातील आमदार मुक्ता टिळक यांचे २२ डिसेंबर रोजी निधन झाले आहे.

दरम्यान, भाजप आमदार मुक्ता टिळक आणि लक्ष्मण जगताप हे दोघेही मागच्या बऱ्याच दिवसांपासून आजारी होते. मुक्ता टिळक या कॅन्सरग्रस्त होत्या. त्या मागच्या बऱ्याच दिवसांपासून उपचार घेत होत्या. त्याचबरोबर लक्ष्मण जगताप यांनासुद्धा अनेकवेळा खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले होते पण आज अखेर त्यांची प्राणज्योत मावळली. वयाच्या ५९ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.१९९३-९४मध्ये ते महापालिका स्थायी समिती सभापती होते. १९९८ मध्ये अस्तित्वात आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये त्यांनी प्रवेश केला. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांचे निष्ठावान कार्यकर्ता अशी त्यांची ओळख होती. १९ डिसेंबर २००० ते १३ मार्च २००२ या कालावधीत त्यांनी पिंपरी-चिंचवडचे महापौरपद भुषविले. मात्र, २००३-०४ मध्ये झालेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी स्थानिक स्वराज्य संस्था गटातून त्यांनी पक्षाकडे उमेदवारी मागितली. त्यांना उमेदवारी नाकारण्यात आली. त्यामुळे त्यांनी बंडखोरी केली.

## संपादकीय »

# स्त्रीशिक्षण काळाची गरज

***'माझ्या दृष्टिकोनातून शिक्षण हे एक शस्त्र आहे! या समाजातील अजूनही मागास असलेली विचारसरणी, अंधश्रद्धा, जातिव्यवस्था, अनिष्ठ रूढी-परंपरा यांविरुद्ध या 'शस्त्रा'द्वारे आपण लढू शकतो. शिक्षणाशिवाय समाजाची प्रगती नाही.***

आजची स्त्री शिक्षणाच्या जोरावर बाहेर पडू शकते, पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करू शकते, शिक्षणामुळे ती आज प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहे," हे मत आहे शिक्षणासाठी आणि नोकरीसाठी पुण्यात राहणाऱ्या (मूळ-उस्मानाबाद) तेवीसवर्षीय दिव्या संजय कांबळे हिचे.

दिव्या म्हणते : "सावित्रीमाईंच्या अथक प्रयत्नांनंतरही आजसुद्धा समाजातल्या काही घटकांच्या सडक्या मानसिकतेमुळे मुलींना-पंख - असूनही-भरारी घेता येत नाही, क्षमता असूनही ती दाखवण्याची संधी मिळत नाही.

समाजातील विकृत घटकांमुळे मुलींवर बंधने लादली जातात. ग्रामीण भागातल्या अशा बऱ्याच मुली आहेत, ज्या शिक्षणासाठी आजही घरच्यांशी माझ्यासारख्याच लढत आहेत, तर काही जणी घरच्यांच्या मागास विचारसरणीला बळी पडून आपल्या स्वप्नांवर पाणी सोडत आहेत.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे शस्त्र आहे. त्यात मीही स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करत आहे. अशा वेळी अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, नोकरीसाठी खूप धडपड करावी लागते." "सावित्रीबाई फुले यांचे काम आणि माहिती मी शालेय पुस्तकांमधून, तसेच शिक्षकांकडून ऐकले होते. स्त्रीशिक्षण ही काळाची गरज आहे, शिक्षणाअभावी मी आज कुठे असते याचा विचार करून अंगावर अक्षरशः शहारे येतात.आजची महिला स्वतंत्र झाली, सुरक्षित झाली असे जरी वाटत असले तरी तिला आजही बुरसटलेल्या विचारांना तोंड द्यावे लागत आहे, " दिव्याने आजच्या वास्तवाकडेही लक्ष वेधले.

शिक्षणाअभावी असलेली महिला आणि सुशिक्षित महिला या दोघींमध्ये खूप फरक जाणवतो मला.उदाहरणच पाहायला गेलं तर, माझीच आई काही वेळा अंधश्रद्धेला बळी पडताना दिसते, तसेच समाजात लोक काय म्हणतील, आपल्याला ज्या समाजात राहायचे आहे त्यांच्यानुसार चालावं लागेल, त्यांचा विचार करावा लागेल यांसारख्या बुरसटलेल्या विचारांना बळी पडताना तिला मी पाहिले आहे.आजही ग्रामीण भागातील ज्या बायका अशिक्षित आहेत त्या त्यांच्या मुलींचं लग्न कमी वयात करून टाकतात. मुलींचा विचार न करता समाजाचा विचार त्या करतात.

# शिधावाटप आणि भरड धान्ये




येते वर्ष हे भरड धान्यांचे जागतिक वर्ष आहे. भारतात अशी अनेक धान्ये होतात आणि त्यातून पौष्टिक आहार कमी किमतीत तयार होतो. मात्र, आपले त्याकडे दुर्लक्ष होते आहे. या वर्षाच्या निमित्ताने बाजरी, ज्वारी, नाचणी, कांगणी, राळे, वरी, राजगिरा आदी भरड धान्ये विपुल प्रमाणात शिधावाटप यंत्रणेतून नागरिकांपर्यंत जायला हवीत. हे काम केंद्र सरकारने करायला हवे...

लवकरच सुरू होणारे नवीन वर्ष हे भरड धान्यांचे जागतिक वर्ष म्हणून साजरे केले जाणार आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात खासदारांसाठी भरड धान्यांच्या खाद्यपदार्थांचे विशेष भोजन आयोजित केले होते. त्याला पंतप्रधान स्वत: हजर होते. संयुक्त राष्ट्रांनी पुढील वर्ष आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष घोषित केले आहे. नाचणी, बाजरी, ज्वारी, बाजरी आदी भरड धान्ये आपला आहार पौष्टिक बनवतात.

आज भारतात कुपोषणाची समस्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यात गर्भवती माता, नवजात बालके यांचा समावेश असणे हे तर अधिकच क्लेशदायक आहे. खिशाला परवडत नसल्याने कित्येक जण पौष्टिकतेचा खजिना असणाऱ्या भरड धान्यांपासून वंचित राहतात. विशेषतः, श्रमिक वर्ग अंगमेहनतीचे काम पुष्कळ करतो. उन्हात राबून तसेच सतत शारीरिक कसरतीने शरीराची अधिक झीज होत असते. ती भरून काढण्यासाठी पोषक आहार अनिवार्य असतो. पण अशा आहाराची आणि पोटाची गाठभेट होण्यातील प्रमुख अडथळा म्हणजे आर्थिक कमजोरी. शरीराला आराम मिळण्यासाठी शारीरिक कष्टकरी वर्गातील काही लोकांकडून मद्यपान केले जाते. त्यामुळे, शारीरिक हानी होते. कुटुंबात वाद होतात, पैसा वाया जातो. उत्तम आहाराची सवय त्यांच्या नवीन पिढीला लावली तर मद्यापासून ती पिढी लांब राहील. विविध प्रकारच्या धान्यापासून दारू बनते. त्याऐवजी, हे धान्य शिजवण्यासाठी गरिबांच्या चुलीवर यावे. त्यायोगे सकस आहार त्यांना मिळेल. चांगले जेवण जेवावे, असे कुणाला नाही वाटत? सर्वांनाच तसे वाटते. तो मानवी स्वभाव आहे. त्यामुळे ते नैसर्गिक आहे. पण जे निसर्ग निर्मित आहे, ते खाऊन स्वतःचे शरीर तंदुरुस्त ठेवण्यात येणारी अडचण समोर मिळेल, ते खाऊन भुकेची आग शांत करण्यास



भाग पाडते. 'भुकेला कोंडा आणि निजेला धोंडा' हे वाक्य येथे लागू पडते.

खेळाडू मग ते कोणत्याही मैदानी खेळाशी निगडीत असो. त्यांचा सकस, पौष्टिक आहारावर सर्वाधिक भर असतो. कारण त्यावरच त्यांची मदार असते. खेळाडूंना शारीरिक स्तरावर सशक्त बनवण्यासाठी भरड धान्य देणे शक्य आहे का, याचा अभ्यास व्हावा. भारत आंतरराष्ट्रीय स्तरावर शेजारी देश चीनच्या तुलनेत मागे आहे. भारताने पुढे येण्यासाठी दर्जेदार आहाराच्या माध्यमातून पाऊल टाकले पाहिजे. सैन्य पोटावर चालते, असे म्हटले जाते. खेळाडूंचेसुद्धा तसेच आहे. देशात आहाराच्या स्तरावर पाहण्यास मिळत असलेला विरोधाभास दूर व्हावा. संपूर्ण देश सुदृढ, निरोगी होण्यासाठी गरिबांच्या पोटाला पौष्टिक अन्न मिळाले पाहिजे. केंद्राने राज्यांच्या साहाय्याने गरीब जनतेपर्यंत भरड धान्यांच्या माध्यमातून पोषक, चौरस आहार मिळवून देण्याविषयी ठोस निर्णय घ्यावा. गरिबांसाठी ही एक प्रकारची मेजवानी असेल. शिधावाटप केंद्रावर तांदूळ, गहू अल्पदरात मिळतात. त्यात भरड धान्याची भर पडली तर गरिबांच्या चेहऱ्यावरील समाधान अनमोल असेल. त्यामुळे, घोषित केल्यानुसार खऱ्या अर्थी आगामी वर्ष सार्थकी लागेल. लोकप्रतिनिधी तुपाशी आणि जनता उपाशी असे होऊ नये.भारत कृषिप्रधान देश आहे. शेतीचे चोख नियोजन केले तर संपूर्ण जगाची अन्नधान्य, भाजीपाला, फळे आदी शेतमालाची आवश्यकता एकटा भारत पुरवू शकतो. एवढी क्षमता भारतात नक्कीच आहे. त्यायोगे कृषिप्रधान देश म्हणून भारत पुन्हा उदयास येईल. मात्र, या सर्वांसाठी नितांत आवश्यकता आहे ती एकमेकांत ताळमेळ असणे आणि उत्तम नियोजन असणे. रशिया-युक्रेन जगाला विपुल प्रमाणात गहू पुरवतात. भारतही त्यांच्याकडून गहू आयात करतो. हे त्या दोन देशांत युद्ध चालू झाल्यावर अनेक भारतीयांना प्रथमच कळले असेल. अन्यथा, रशियाकडून भारत संरक्षणविषयक सामुग्री आधीपासून घेत आला आहे, हेच अनेकांना ज्ञात आहे. भारत गव्हाचे उदपादन घेण्यात मागे का? हा प्रश्न आल्याविना राहात नाही.

नैसर्गिक शेतीद्वारे पिकवण्यात येत असलेल्या शेतमालाला जगभरात प्रचंड मागणी आहे.

# युक्रेन युद्धात भारताची मध्यस्थी निर्णायक ठरेल?

**रशिया-युक्रेन युद्धामुळे ऊर्जा व अन्नसुरक्षेची तीव्र समस्या भेडसावत असून जगाला महायुद्धाच्या उंबरठ्यावर आणून ठेवले आहे. हा संघर्ष चिघळल्याने जगभरातील देशांमधील राजनैतिक संबंधांबरोबरच अर्थव्यवस्थांचेही मोठे नुकसान होत आहे.**

यात अविकसित देश अधिक भरडले जात आहेत. साधारण २.१३३ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था असलेल्या रशियाने गेल्या दहा महिन्यात युद्धावर सुमारे ११० अब्ज डॉलरपेक्षा अधिक खर्च केला आहे तर युक्रेनचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष असे एक ट्रिलियन डॉलर इतके प्रचंड नुकसान झाल्याचा अंदाज आहे. या युद्धात आतापावेतो रशिया व युक्रेनचे सुमारे दोन लाख सैनिक मारले गेल्याचा अंदाज अमेरिकी सैन्यप्रमुख जनरल मार्क मिली यांनी व्यक्त केला आहे तर संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क उच्चायुक्तांनुसार ६,८२६ नागरिक मारले गेले आहेत. सुमारे एक कोटी ४० लाख रहिवाशांनी युक्रेन सोडले आहे तर युद्धाच्या भीतीने रशियातून देखील स्थलांतर सुरू झाले आहे. आंतरराष्ट्रीय भावना रशियाच्या विरोधात असल्यामुळे ॲपल, मॅकडोनाल्ड, बीएमडब्ल्यू, एअरबस, युरोपियन स्पेस एजन्सी, ओरॅकलसारख्या सुमारे हजारभर आंतरराष्ट्रीय उद्योगांनी रशियातून आपला गाशा गुंडाळला आहे. याचा विपरीत परिणाम



होऊन रशियातील औद्योगिक उत्पादन, गुंतवणूक, नवोपक्रम व रोजगारात मोठी घट झाली आहे. रशियाच्या सर्वात मोठ्या स्बेर बँकेसह रशियन बँकांना 'स्विफ्ट' या आंतरराष्ट्रीय बँकप्रणालीतून बाहेर काढण्यात आले. परिणामी, रशियाला मोठ्या आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

जागतिक बँकेने रशियाचे सकल राष्ट्रीय उत्पन्न (जीडीपी) २०२२ मध्ये ८.९ टक्क्यांनी घसरण्याचा अंदाज वर्तविला आहे. तर हार्वर्ड केनेडी स्कूलच्या 'रशिया मॅटर्स'मध्ये अँडर्स ॲसलंड या स्वीडिश अर्थतज्ज्ञाने, रशियाने १९९१ पासून साधलेल्या विकासातील साधारण निम्म्याहून अधिक हिस्सा युद्धावरील खर्चापोटी व आर्थिक निर्बंधांमुळे होणाऱ्या प्रचंड नुकसानीमुळे गमावला असल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. थोडक्यात, रशियाच्या नुकसानीचा आकडा दिसतो त्यापेक्षा कित्येक पटीने अधिक आहे. रशियाच्या आक्रमणाला जगभरातून आणि खुद्द रशियातूनच विरोध होत आहे. म्हणूनच रशियाचे आणखी अधःपतन रोखण्यासाठी युद्धातून सन्मानजनक माघार घेण्याची पुतीन यांच्यासाठी ही योग्य वेळ आहे असे मत तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत.

दुसरीकडे, आर्थिक निर्बंध लादून रशियाला गुडघ्यावर आणू अशी भाषा करणाऱ्या युरोपियन राष्ट्रांमध्येही युद्धसमाप्तीच्या भाषेने जोर धरला आहे. कारण अर्थातच युक्रेनला युद्धासाठी पुरवित असलेल्या शस्त्रास्त्रे व युद्धसाहित्याचा खर्च आवाक्याबाहेर गेला आहे. इंधन दरवाढीमुळे महागाईच्या आगीत युरोप होरपळून निघत आहे. अमेरिकेतही रिपब्लिकन व डेमोक्रॅट नेते युद्धावर करीत असलेल्या अमेरिकेच्या वारेमाप खर्चावर प्रश्नचिन्ह उपस्थित करू लागले आहेत आणि म्हणूनच की काय, वॉशिंग्टनने आपल्या युद्धविषयक धोरणात बदल करून रशियाशी वाटाघाटी करण्यासंबंधी धोरणात लवचिकता आणावी असा सल्ला युक्रेनला दिला आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# महावितरणचे शटडाऊन?

## संपामुळे पुढचे तीन दिवस खरंच वीजपुरवठा खंडीत

**राज्यातील 86 हजार वीज कामगार, अभियंते, अधिकारी व 42 हजार कंत्राटी कामगार, सुरक्षा रक्षकांनी 72 तासांचा पुकारला संप**

**मेसेजही सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.**

**महावितरणचे ग्राहकांना केलं असं आवाहन**

**पुढचे तीन दिवस राज्यातील वीजपुरवठा खंडीत**

| मुंबई | महाईन्यूज |

वीज वितरणाच्या खासगीकरणाला विरोध यासह अदानी वीज कंपनीला वितरणाचा परवाना देऊ नये आदी मागण्यांसाठी ४ जानेवारीपासून (मंगळवारी रात्री १२ वाजेपासून) राज्यातील ८६ हजार वीज कामगार, अभियंते, अधिकारी व ४२ हजार कंत्राटी कामगार, सुरक्षा रक्षकांनी ७२ तासांचा संप पुकारला आहे. परिणामी, राज्यभरातील वीज यंत्रणा कोलमडून पडण्याची भीती व्यक्त होत आहे. तसेच या संपामुळे पुढचे तीन दिवस राज्यातील वीजपुरवठा खंडीत राहिल, अशा प्रकाराचा मेसेजही सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या मनात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्या पार्श्वभूमीवर महावितरणने महत्त्वपूर्ण माहिती देत राज्यभरातील वीज ग्राहकांसह सर्वसामान्यांना आवाहन केलं आहे.

### वीज कर्मचाऱ्यांना संप

मागे घेण्याचं आवाहन करताना महाराष्ट्र राज्य वीज वितरण मंडळाचे संचालक विश्वास पाठक यांनी राज्यातील वीजपुरवठा अखंडित राहील, अशी माहिती दिली आहे. राज्यातील जनतेने कुठेही भयभीत होण्याची आवश्यकता नाही. वीज कर्मचारी त्यांच्या संपाविषयीची भूमिका बदलतील याची खात्री आहे. अन्यथा पर्यायी व्यवस्था झाली असल्याने विद्युत पुरवठा अखंडित राहील याची खात्री बाळगावी, असे विश्वास पाठक यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे.



दरम्यान, वीज कर्मचाऱ्यांनी सुरू केलेल्या आंदोलनामध्ये त्यांच्या कोणत्याही आर्थिक मागण्या नाहीत. तर जनतेच्या मालकीचा वीज उद्योग टिकला पाहिजे. तो भांडवलदारांना विकता कामा नये. भांडवलदार नफा कमविण्याच्या उद्देशाने वीज वितरण क्षेत्रात येत आहे. भांडवलदार आले तर अनुदानित वीज बंद होईल.

आदिवासी दुर्गम भागातील ग्राहकांना वीज मिळणार नाही. भांडवलदार नफ्याचे क्षेत्र ताब्यात घेतील. तोट्यात असलेले क्षेत्र महावितरणकडे राहील. त्यामुळे महावितरणचा तोटा वाढत जाईल. त्यामुळे हे आंदोलन हाती घेण्यात आल्याचे महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी, अभियंते, अधिकारी संघर्ष समितीकडून सांगण्यात आले.

सरकारने यानंतरही वीज कंपन्यांच्या खासगीकरणाचे धोरण थांबविले नाही तर १८ जानेवारीपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय संघर्ष समितीने घेतला आहे. दरम्यान, या संपाबाबतचा एक मेसेज सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

### संपकऱ्यांवर कारवाईचा बडगा

महावितरणने ठरवून दिलेली कामे न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यात येणार आहे. तर रजेवर असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना कामावर रूजू होण्याचे आदेशही प्रशासनाने दिले आहेत.

### अशी घेणार खबरदारी

वीज पुरवठ्याच्या परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी मुख्यालयासह सर्व परिमंडल व मंडल कार्यालयांच्या ठिकाणी नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले आहेत.

### नियंत्रण कक्ष 24 तास कार्यरत राहणार आहेत

एजन्सीचे कामगार, कंत्राटी कामगार, सेवानिवृत्त अभियंते व कर्मचारी तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत निरीक्षक व महाऊर्जा विभागातील अभियंत्यांना संपकाळात विविध उपकेंद्राच्या ठिकाणी नेमण्यात येणार आहे.

### ...तर एजन्सीदेखील बडतर्फ

महावितरणतर्फे नियुक्त करण्यात आलेल्या ज्या एजन्सी संपकाळात काम करणार नाहीत, त्यांना बडतर्फ करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आवश्यक साहित्याची व्यवस्था करण्याचे निर्देश सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

# शिवसेना-वंचितचं ठरलं!

## मुंबई महापालिका निवडणुक एकत्र लढणार, पण...

| मुंबई | महाईन्यूज |

ठाकरे गटाची शिवसेना आणि प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी, हे दोन्ही पक्ष एकत्र येणार असं चित्र मागील काही दिवसांपासून दिसून येत आहे. उद्धव ठाकरे आणि प्रकाश आंबेडकर यांच्यामध्ये एकत्र येण्यासंदर्भात बोलणी झालेली आहे.

मात्र महाविकास आघाडीतील इतर पक्षांचा वंचितला सोबत घेण्यासाठी विरोध असल्याचं सांगितलं जातंय. त्यावर प्रकाश



आंबेडकर यांनी माहिती दिली ते म्हणाले, "मुंबई महानगरपालिका निवडणुकीत वंचीत बहुजन विकास अघाडी ८३ जागा लढण्याची तयारी केली होती,

मात्र शिवसेना जेवढ्या जागा सोडेल तेवढ्या जागा लढवू अशी माहिती प्रकाश आंबेडकर यांनी दिली आहे. ते म्हणाले येणाऱ्या महापालिका निवडणुक शिवसेनेसोबत लढण्याचा निर्णय झालाय, मात्र शिवसेनेचा हा प्रयत्न आहे की काँग्रेस आणि राष्ट्रवादी या पक्षाना देखील सोबत घेतलं पाहिजे त्यावर आम्ही म्हणालो आमचा त्याला विरोध नाही.

मात्र मला सुत्रांकडून समजत आहे की या युतीला राष्ट्रवादीचा उघड विरोध आहे. तर काँग्रेसचा छुपा विरोध आहे. असं मला कळालं आहे. या पक्षाना वाटत नाही की गरीब मराठा सत्तेत यावा, म्हणून वंचितला विरोध आहे. असं मत प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केलं.

# बारामतीमध्ये अजित पवारांच्या विरोधात आंदोलन!

| मुंबई | महाईन्यूज |

छत्रपती संभाजी महाराजांविरोधात वादग्रस्त विधान केल्याप्रकरणी जिल्हा भारतीय जनता पक्षाच्या वतीने बारामतीमध्ये अजित पवार यांच्याविरोधात आंदोलन करण्यात आले. विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली, तसेच मोर्चाही काढण्यात आला.

छत्रपती संभाजी महाराजांच्या विरोधात विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी नागपूर हिवाळी अधिवेशनात वादग्रस्त विधान केले



होते. त्याविरोधात भारतीय जनता पक्षाने आक्रमक भूमिका स्वीकारली असून राज्यभर आंदोलने करण्यात येत आहेत. त्याचे पडसाद अजित पवार यांचा बालेकिल्ला असलेल्या बारामतीमध्येही उमटले. भाजप आणि मित्रपक्षांच्या वतीने बारामतीमध्ये मोर्चा काढत वादग्रस्त विधानाचा निषेध नोंदविण्यात आला. भाजप जिल्हाध्यक्ष गणेश भेगडे, प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात संघटन सरचिटणीस धर्मेंद्र खांडरे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष जालिंदर कामटे, बाळासाहेब गावडे, दिलीप खैरे, रंजन तावरे, तानाजी थोरात, सुरेंद्र जेवरे, मारूती वनवे, देवेंद्र बनकर यांच्यासह अन्य पदाधिकारी या वेळी उपस्थित होते. अजित पवार यांनी माफी मागावी, अशी मागणी या वेळी करण्यात आली.

# कोरोनाचं संकट, देशात अलर्ट !

## दुसरा बूस्टर डोस घ्यावा लागणार? सरकारमध्ये खलबतं

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

संसर्ग वाढत आहे. या पार्श्वभूमीवर कोरोनाच्या संभाव्य लाटेचा धोका लक्षात घेता भारत सरकार अलर्ट मोडवर आहे. केंद्र सरकारची आरोग्य तज्ज्ञ समिती कोविड-19 प्रतिबंधात्मक लसींच्या बूस्टर डोसच्या गुणवत्तेवर विचार करत आहे. दुसरा बूस्टर डोस घेण्याबाबत सरकारमध्ये खलबतं सुरु आहेत. पहिला बूस्टर डोस आणि त्याचा परिणाम तसेच गुणवत्ता यांचा कालावधी तपासला जात आहे. सध्या फक्त 28 टक्के लोकांनी बुस्टर डोस घेतला आहे.




**4 ते 6 महिन्यांत रोगप्रतिकारशक्ती कमी होते**

संशोधनात समोर आलेल्या माहितीनुसार, कोरोना प्रतिबंधात्मक लसीमुळे मिळालेली प्रतिकारशक्ती साधारणपणे चार ते सहा महिन्यांनी कमी होते. तसेच बूस्टर डोस गंभीर आजारापासून बचाव करण्यास मदत करतो. तज्ज्ञ आता दुसरा बूस्टर डोस म्हणजे कोविड लसीचा चौथा डोस घेण्याबाबत आरोग्य प्रशासनाचं निरीक्षण सुरु आहे. याबाबत अधिक माहिती येत्या काळात समोर येईल.

**चौथा डोस सुरू करण्याची डॉक्टरांची मागणी**

काही डॉक्टरांनी कोविड लसीचा चौथा डोस म्हणजे दुसरा कोविड बूस्टर डोस सुरु करण्याची मागणी केली आहे. अधिक जोखीम असलेल्या लोकांसाठी जसे की आरोग्य सेवा कर्मचारी, वृद्ध आणि गंभीर आजार असलेल्या लोकांसाठी दुसरा बूस्टर डोस देण्याची विनंती करण्यात आली आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनच्या प्रतिनिधींनी 26 डिसेंबर रोजी झालेल्या बैठकीत केंद्रीय आरोग्य मंत्री मनसुख मांडविया यांना दुसऱ्या बूस्टर डोसबाबत सांगितले आहे. आरोग्य सेवा आणि फ्रंटलाइन कामगारांसाठी सुमारे एक वर्षापूर्वीच कोविड लसीचा तिसरा डोस देण्यात आला होता.

यावेळी संघटनेचे माजी अध्यक्ष डॉ. जे.ए. जयलाल उपस्थित होते. डॉ जे.ए. जयलाल यांनी सांगितले की, 'आम्ही आरोग्यमंत्र्यांना नागरिकांसाठी, विशेषतः डॉक्टर, परिचारिका, रुग्णालयातील इतर कर्मचारी आणि फ्रंटलाइन कामगार ज्यांना रुग्णांचे व्यवस्थापन करावे लागते आणि ज्यांना संसर्गाचा जास्त धोका असतो त्यांच्यासाठी दुसरा कोविड बूस्टर डोस देण्याबाबत निर्णय घेण्याचे आवाहन केले आहे.

**बूस्टर डोस देण्यावर सरकारचा भर**

केंद्र सरकारकडून सध्या बूस्टर डोस देण्यावर भर दिला जात आहे. आरोग्य विभागाकडून नागरिकांना वारंवार बूस्टर डोस घेण्याचे आवाहन केले जात आहे. सध्या केंद्र सरकारचे लक्ष तिसऱ्या डोसचे देण्याचे प्रमाण वाढविण्यावर आहे. आतापर्यंत देशातील फक्त 28 टक्के लोकांनी बूस्टर डोस घेतला आहे. केंद्र सरकारच्या एका अधिकाऱ्याने सुत्रांना दिलेल्या माहितीनुसार, 'दुसऱ्या बूस्टर डोसबाबच चर्चा सुरु आहे, पण अद्याप सरकारने याबाबत कोणतीही निर्णय घेतलेला नाही.

### बूस्टर डोस घेण्याचे सरकारचे आवाहन

**कोरोना संसर्ग वाढण्याची शक्यता पाहता, केंद्र सरकारकडून नागरिकांना बूस्टर डोस घेण्याचे आवाहन केले जात आहे. भारताने जानेवारी 2022 मध्ये कोविड लसीचा बूस्टर देण्यास सुरुवात झाली. नॅशनल टेक्निकल ॲडव्हायझरी ग्रुप एक्सपर्टने सांगितले आहे की, केंद्र सरकारच्या आरोग्य तज्ज्ञ समितीकडून दुसरा बूस्टर डोसचा घेण्याची गरज आहे का, यावर विचार केला जात आहे. याबाबत कोणताही निर्णय घेण्यापूर्वी सर्व वैज्ञानिक डेटाचा बारकाईने अभ्यास करण्यात येईल.**

## रायपूरमध्ये होणार काँग्रेसचे 3 दिवसीय महाअधिवेशन

### काँग्रेस कार्यकारिणी समिती निवडीचा मार्गही मोकळा होणार

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

छत्तीसगडची राजधानी रायपूरमध्ये २४ ते २६ फेब्रुवारी या काळात काँग्रेसचे ८५ वे महाअधिवेशन होणार आहे. या अधिवेशनातच पक्षाचे सर्वोच्च धोरण ठरवणाऱ्या काँग्रेस कार्यकारिणी समितीच्या निवडीचाही मार्ग मोकळा होणार आहे. काँग्रेसचे नवनिर्वाचित अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवडीला मंजुरी देण्यासाठी बोलावण्यात आलेल्या या अधिवेशनात निवडणुकीद्वारे नवीन कार्यकारिणी स्थापन करायची की काँग्रेस प्रदेशाध्यक्षांना सर्वानुमते नामनिर्देशित करण्याचे अधिकार दिले जातील, याबाबतचा निर्णय घेतला जाणार आहे.

या पार्श्वभूमीवर काँग्रेस मुख्यालयात आयोजित पत्रकारपरिषदेत माहिती देताना काँग्रेसचे संघटन सरचिटणीस केसी वेणुगोपाल यांनी जाहीर केले की,



रायपूरमध्ये होणाऱ्या तीन दिवसीय अधिवेशन काळात पक्ष घटनेशी संबंधित काही अनिवार्य दुरुस्त्याही केल्या जातील. अधिवेशन काळात खरगे यांच्या अध्यक्षपदी निवडीवर शिक्कामोर्तब करण्याबरोबरच कार्यकारिणीच्या स्थापनेचा मुद्दाही महत्त्वाचा ठरणार आहे.

याशिवाय पक्षातील एक मोठा वर्ग दीर्घकाळापासून कार्यकारिणी सदस्यांच्या निवडीची मागणी करत आहे याबाबत विचारले असता, वेणुगोपाल यांनी सांगितले की पक्षाच्या घटनेनुसार कार्यकारिणी निवडीची प्रक्रिया पूर्ण होईल.

काँग्रेस संघटनेचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल यांनी पक्षाच्या मुख्यालयात पत्रकार परिषदेत घोषणा केली की रायपूर येथे होणाऱ्या तीन दिवसीय अधिवेशनात पक्ष घटनेशी संबंधित काही अनिवार्य दुरुस्त्याही केल्या जातील. अधिवेशन काळात खरगे यांच्या अध्यक्षपदी निवडीवर शिक्कामोर्तब करण्याबरोबर कार्यकारिणीच्या स्थापनेचा मुद्दाही महत्त्वाचा ठरणार आहे. पक्षातील एक मोठा वर्ग दीर्घकाळापासून कार्यकारिणी सदस्यांच्या निवडीची मागणी करत आहे आणि याबाबत विचारले असता वेणुगोपाल म्हणाले की, कार्यकारिणीच्या स्थापनेची प्रक्रिया पक्ष घटनेनुसार पूर्ण केली जाईल.

सर्वानुमते ठराव करून निवडणूक घ्यायची की काँग्रेस अध्यक्षांना अधिकार द्यायचे, याचा निर्णय अधिवेशनातच घेतला जाणार आहे. पक्ष घटनेनुसार, काँग्रेस कार्यकारिणीच्या १२ सदस्यांची निवड करण्याची तरतूद आहे, तर १२ जणांना काँग्रेस अध्यक्षांकडून नामनिर्देशित केले जाते. वेणुगोपाल म्हणाले की, तीन दिवसीय अधिवेशनात देशाची राजकीय परिस्थिती, परराष्ट्र धोरण, अर्थव्यवस्था, महागाई-बेरोजगारी, कृषी आणि शेतकऱ्यांची स्थिती तसेच सामाजिक क्षेत्राशी निगडीत सहा विषयांवर सखोल चर्चा होणार आहे.

या सर्व प्रश्नांबाबत अधिवेशनात ठरावही पारित करण्यात येणार आहेत. ३१ जानेवारीपासून प्रस्तावित संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा संपल्यानंतर काँग्रेसचे हे पूर्ण अधिवेशन होणार आहे. सर्वसाधारण अर्थसंकल्प १ फेब्रुवारीला सादर होणार असून अधिवेशनाचा पहिला टप्पा फेब्रुवारीच्या मध्यापर्यंत चालण्याची शक्यता आहे.

## "नोटबंदीचा निर्णय घेताना केंद्राने विश्वासात घेतलं नाही", आरबीआयची माहिती

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।



सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने सोमवारी नोटबंदीबाबत मोठा निर्णय दिला आहे. केंद्र सरकारने सहा वर्षापूर्वी ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा चलनातून रद्द करण्याचा घेतलेला निर्णय ४:१ च्या बहुमताने कायम ठेवला. पण नोटबंदीच्या निर्णय प्रक्रियेत आरबीआयला विश्वासात घेतलं नसल्याची माहिती आरबीआयकडून देण्यात आली आहे.

"नोटबंदीचा निर्णय घेण्याआधी सहा महिने केंद्र सरकार आरबीआयशी सल्लामसलत करत होतं, असं सांगण्यात आलं. पण आरबीआय मंडळाला निर्णय प्रक्रियेत सामावून घेण्यात आलं नाही. कदाचित आरबीआयचे एक-दोन अधिकारी निर्णय प्रक्रियेचा भाग असतील. पण नोटबंदीचा निर्णय घेण्यापूर्वी अर्धा ते एक तास आधी एक बैठक बोलवण्यात आली. तसेच या बैठकीच्या विषयाची माहितीही आरबीआय अधिकाऱ्यांना देण्यात आली नव्हती, असं एका अधिकाऱ्याने सांगितले. नोटबंदीच्या निर्णय प्रक्रियेत आरबीआय बोर्डाला विश्वासात घेतलं नव्हतं, असे संकेत एका अधिकाऱ्याने दिले.आरबीआय बोर्डाने मे २०१६ मध्ये म्हणजेच नोटबंदीच्या सहा महिने आधी दोन हजार रुपयांच्या नवीन नोटा चलनात आणण्यास मंजुरी दिली होती. परंतु २०१६ मध्ये जुलै आणि ऑगस्ट महिन्यात आरबीआय बोर्डच्या बैठकांमध्ये ५०० आणि एक हजार रुपयांच्या नोटा मागे घेण्याबाबत कोणतीही चर्चा केली नाही, असंही आरबीआयकडून सांगण्यात आलं.

## नाद खुळा; गौतमी पाटीलच्या चाहत्याने लढवली 'ही' शक्कल

प्रसिद्ध लावणी नर्तिका गौतमी पाटील गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत आहे. अश्लीलतेचे प्रदर्शन करत असल्याच्या वादावरुन गौतमीच्या कार्यक्रमांवर बंदी घालण्याची मागणी होत आहे. लावणीच्या तालावर प्रेक्षकांनाही ठेका धरायला लावणारी गौतमीच्या लावणीच्या कार्यक्रमांना चाहते तुफान गर्दी करतात. तिचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणावर आहे. अशाच एका चाहत्याने एक शक्कल लढवली आहे.गौतमी पाटीलचे पुणे सोलापूर परिसरात अनेक ठिकाणी कार्यक्रम होत आहेत. अशातच पुणे सोलापूर मार्गावर टेंभुर्णी गावात हॉटेल 'सुमन' या शुद्ध शाकाहारी हॉटेलचे उद्घाटन झाले. विशेष म्हणजे या हॉटेलचे मालक महेश गोरे यांनी गौतमी पाटील यांच्या हस्ते हॉटेलचे उदघाटन केले. इतकंच नव्हे तर गौतमीच्या नावाने त्याने थाळीदेखील सुरु केली आहे. गौतमी पाटीलची दिवसेंदिवस वाढणारी लोकप्रियता लक्षात घेता त्याने मालकांनी ही शक्कल लढवली आहे.गौतमीच्या नावाची थाळी शाकाहारी असून तिची किंमत २४० रुपये इतकी असणार आहे. त्यामुळे आता



## अभिनेत्रींचा हनी ट्रॅपसाठी वापर



बॉलिवूडच्या अभिनेत्री फोटोशूटमुळे किंवा पार्टीतील बोल्ड लूकमुळे चर्चेत येत असतात. तसेच सोशल मीडियासारख्या माध्यमावर आपले मत व्यक्त करतानादेखील ट्रोल होत असतात. अभिनेत्रींना गैरवर्तवणुकीलादेखील सामोरे जावे लागते. बॉलिवुड्याच नव्हे तर पाकिस्तानातील अभिनेत्रींनबाबत फसवणूक झाली आहे.

निवृत्त पाकिस्तानी लष्करी अधिकारी मेजर आदिल राजा यांनी नुकताच एका खुलासा केला आहे. माजिर राजा हे YOUTUBER देखील आहेत. त्याने आरोप केला आहे की पाकिस्तानच्या लष्कराने अभिनेत्री सजल अलीचा 'हनी ट्रॅप' म्हणून वापर केला होता. मेजर राजा 'सोल्जर स्पीक्स' नावाचे यूट्यूब चॅनल चालवतात आणि त्यांचे सुमारे ३ लाख सदस्य आहेत.अभिनेत्री तिच्या आणि इतर काही अभिनेत्रींवर बिनबुडाचे आरोप केल्याबद्दल सजल अलीने मेजर राजा यांच्यावर टीका केली आहे. सामा टीव्हीशी बोलताना तिने हे सांगितले. मेजर राजाने कोणत्याही अभिनेत्रीचे नाव घेतले नाही फक्त अभिनेत्रींची आद्याक्षरे वापरली. काही वेळातच हा व्हिडिओ व्हायरल झाला आणि लोकांनी असा अंदाज लावला की व्हिडिओमध्ये नमूद केलेली आद्याक्षरे ही त्या अभिनेत्रींची आहेत ज्यांनी इंटर सर्व्हिसेस पब्लिक रिलेशन्स (ISPR) निर्मित नाटकांमध्ये काम केले होते.

## "3 जानेवारी दिवसाने माझे पूर्ण आयुष्य बदलले..." प्रथमेश परब



मराठी कलाविश्वातील लोकप्रिय अभिनेता प्रथमेश परब सध्या सोशल मीडियावर चर्चेत आहे. 'टाइमपास' चित्रपटातून प्रसिद्धी मिळविलेल्या प्रथमेश 'टकाटक', 'उर्फी', 'बीपी', 'एक नंबर' अशा चित्रपटातून अभिनयाचा ठसा उमटवला. नुकतंच प्रथमेश अजय देवगणच्या 'दृश्यम २' या चित्रपटातही झळकला. मात्र टाईमपास चित्रपटाने तो प्रसिद्धीच्या झोतात आला. या चित्रपटाची आठवण त्याने सोशल मीडियावर शेअर केली आहे.

प्रथमेश परब सोशल मीडियावर सक्रीय असतो. त्याने 'टाईमपास' चित्रपटातील फोटो शेअर करत लिहले आहे, "३ जानेवारी दिवसाने माझे पूर्ण आयुष्य बदलले. या दिवसाने मला दगडू नावाची नवी ओळख मिळवून दिली. जी आयुष्यभर माझ्याबरोबर असणार आहे. ज्या दिवसाने मला मोठा ब्रेक दिला. जो प्रत्येक अभिनेत्याला हवा असतो. ज्या दिवसाने स्वप्नांवर विश्वास ठेवायला शिकलो. हा दिवस माझ्यासाठी कायम लक्षात राहील." अशा शब्दात त्याने आपल्या भावना व्यक्त केल्या.'टाईमपास ३' हा नुकताच प्रदर्शित झाला होता, ज्यात ऋता दुर्गुळे अभिनेत्री म्हणून दिसली होती. पहिल्या भागात दगडू प्राजक्ता यांची प्रेमकहाणी दाखवण्यात आली होती. कॉलेज विश्वातील प्रेम मग ताटातूट असे चित्रपटाचे कथानक होते. प्रथमेश परब, केतकी माटेगावकर मुख्य भूमिकेत होते. तर वैभव मांगले, भाऊ कदम हे विशेष भूमिकेत होते.

दिग्दर्शक रवी जाधव यांनी 'टाईमपास' चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते. चित्रपटातील संवाद प्रियदर्शन जाधवने लिहले आहे, यात चित्रपटातील गाणी, संवाद विशेष गाजले. ३ जानेवारी २०१४ रोजी हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाने ३३ कोटींची कमाई केली होती.

## देबिना बॅनर्जी आणि गुरमीत चौधरीच्या दुसऱ्या लेकीचे नाव अखेर समोर

अभिनेत्री देबिना बॅनर्जी ही मालिका विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री आहे. गुरमीत चौधरीसह विवाहबंधनात अडकल्यानंतर ११ नोव्हेंबरला ते दोघेजण दुसऱ्यांदा आई-बाबा झाले. देबिनाला अकरा वर्षांनी एप्रिल २०२२ मध्ये त्यांना कन्यारत्नाची प्राप्ती झाली. त्यानंतर लगेचच ११ नोव्हेंबर २०२२ ला देबिना दुसऱ्यांदा आई झाली. तिने एका गोंडस मुलीला जन्म दिला. लेकीच्या जन्मानंतर दोन महिन्यांनी आता त्या दोघांनी तिच्या नावाची घोषणा केली आहे.

गुरमीत चौधरीने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी त्यांच्या लेकीबरोबरच्या खास फोटोशूटचे फोटो पोस्ट केले आहेत.



या फोटोत देबिना आणि गुरमीत एका समुद्रकिनाऱ्यावर पाहायला मिळत आहेत. ते दोघेही त्यांच्या लेकीला खेळवताना दिसत आहेत. या फोटोवर त्यांनी तिचे नावही लिहिले आहे. गुरमीत चौधरी आणि देबिना बॅनर्जी यांच्या दुसऱ्या लेकीचे नाव दिविशा असे आहे. या फोटोला कॅप्शन देताना गुरमीत म्हणाला, "आमच्या लेकीचे नाव दिविशा असे आहे. सर्व देवींची प्रमुख आणि दुर्गेचे रुप असा या नावाचा अर्थ होतो." दरम्यान गुरमीत चौधरी व देबिना बॅनर्जी मालिका विश्वातील लोकप्रिय जोडपं आहे. २०११ साली विवाहबंधनात अडकत त्यांनी नवीन आयुष्याला सुरुवात केली. लग्नानंतर तब्बल ११ वर्षांनी देबिना व गुरमीतच्या आयुष्यात चिमुकलीचं आगमन झालं. दरम्यान देबिनाने एप्रिल २०२२मध्ये पहिल्या मुलीला जन्म दिला.

# हार्दिक ब्रिगेडने केले लंकादहन!

## टीम इंडियाचा श्रीलंकेवर दोन धावांनी विजय, मालिकेत 1-0 ने आघाडी

**। नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**भारतीय संघ २०२३ मधील पहिला सामना मंगळवारी (३ जानेवारी) मुंबईच्या वानखडे स्टेडियमवर खेळला गेला. भारत आणि श्रीलंका यांच्यातील टी२० मालिकेला आजपासून सुरुवात झाली आणि त्यात भारतीय संघाने २ धावांनी विजय मिळवला. अक्षर पटेलने टाकलेल्या शेवटच्या जादुई षटकाने भारताला विजय मिळवून दिला. शिवम मावीने धारदार गोलंदाजी करत श्रीलंकेच्या फलंदाजांना पळताभुई थोडी केली. हार्दिक पांड्याने संघाच्या कर्णधाराची जबाबदारी उत्तम पार पाडली.**

हार्दिकच्या नेतृत्वातील युवा ब्रिगेडने श्रीलंकेविरुद्धच्या या टी२० मालिकेत गुणवत्ता सिद्ध करत वानखेडे मैदानावर



२०० पेक्षा कमी धावसंख्येचा पहिल्यांदा बचाव करताना एक नवीन इतिहास रचला. दिपक हुड्डाला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

भारतीय संघ पहिल्या टी२० सामन्यात नाणेफेक गमावत फलंदाजीला उतरला होता. प्रथम फलंदाजी करताना भारताने श्रीलंकेसमोर १६३ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. या सामन्यात भारतीय संघाच्या वरच्या फळीने झटपट विकेट्स गमावल्या होत्या. भारताचा अर्धा संघ तंबूत गेला होता. मात्र, भारताच्या तळातील फलंदाजांनी अशी काही खेळी केली की, पाहुण्या संघाला सहावी विकेट मिळालीच नाही.

यासह तळातील फलंदाजांच्या जोडीने शानदार भागीदारी रचत खास विक्रमाची नोंद केली.ती जोडी इतर कुणी नसून दीपक हुड्डा आणि अक्षर पटेल यांची जोडी आहे. भारतीय संघ एकेवेळी १४.१ षटकात ५ विकेट्स गमावत ९४ धावांवर खेळत होता. त्यावेळी मैदानावर हुड्डा आणि पटेल खेळत होते. या दोघांनीही विकेट न गमावता श्रीलंकेच्या गोलंदाजांना चोप देण्यास सुरुवात केली. यावेळी या जोडीने नाबाद ६८ धावांची भागीदारी रचली. यावेळी हुड्डाने ३५, तर पटेलने ३१ धावांचे योगदान दिले. दिलशान मदुशंका, महेश तीक्षणा, चमिका करुणारत्ने, वानिंदू हसरंगा आणि धनंजया डी सिल्वा यांनी मिळून पॉवर प्ले मध्ये भारताच्या धावसंख्येला ब्रेक लावला. टीम इंडियाच्या बाकी फलंदाजांना फारशी मोठी धावसंख्या उभारता आली नाही. सूर्यकुमार यादव, शुबमन गिल आणि संजू सॅमसन यांना दोन आकडी धावसंख्या देखील गाठता आली नाही.

### श्रीलंकेच्या सर्व गोलंदाजांना प्रत्येकी एक विकेट

**धावांचा पाठलाग करताना यजमानांची खराब सुरुवात झाली. श्रीलंका संघाकडून फलंदाजी करताना कर्णधार दसून शनाका याने सर्वाधिक धावा केल्या. त्याने २७ चेंडूत ४५ धावा केल्या. या धावा करताना त्याने ३ चौकार आणि ३ षटकारांची बरसात केली. त्याच्याव्यतिरिक्त यष्टीरक्षक फलंदाज कुसल मेंडिस याने २८, तर वनिंदू हसरंगा याने २१ धावांचे योगदान दिले. याव्यतिरिक्त एकाही फलंदाजाला २० धावांचा आकडा पार करता आला नाही. भारताकडून शिवम मावी सर्वाधिक ४ गडी बाद केले. तर उमरान मलिक आणि हर्षल पटेल यांनी प्रत्येकी दोन गडी बाद विजयात मोलाची साथ दिली. खराब सुरुवात असूनही अक्षर पटेल आणि दीपक हुडा यांच्या शानदार भागीदारीमुळे टीम इंडियाने पाच गडी गमावून १६२ धावा केल्या. दीपक हुडाने सर्वाधिक ४१ धावा केल्या. इशान किशनने ३७, अक्षरने ३१ आणि हार्दिकने २९ धावा केल्या. कासून रजिथा वगळता श्रीलंकेच्या सर्व गोलंदाजांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.**

---

# रणजी ट्रॉफीत जयदेव उनाडकटने रचला इतिहास

## हा' विक्रम करणारा ठरला पहिला खेळाडू

**ओडिसा । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

जयदेव उनाडकटने मंगळवारी प्रथम श्रेणीतील कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी केली. रणजी ट्रॉफीची चौथी फेरी सुरू झाली. सौराष्ट्र आणि दिल्ली संघ एका सामन्यात आमनेसामने आहेत. डावखुरा वेगवान गोलंदाज आणि सौराष्ट्राचा कर्णधार उनाडकटने हॅट्रिकसह ८ बळी घेतले. ज्यात राजकोट येथे दिल्ली विरुद्ध खेळल्या जात असलेल्या सामन्याच्या पहिल्या षटकात हॅटट्रिकचा समावेश होता. अशाप्रकारे, जयदेव उनाडकट डावाच्या पहिल्याच षटकात हॅट्रिक घेणारा रणजी ट्रॉफी इतिहासातील पहिला गोलंदाज ठरला.

भारतीय संघाला आपली पुढील



कसोटी मालिका ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळायची आहे. अशा स्थितीत उनाडकटची कामगिरी निवडकर्त्यांना प्रभावित करेल. तसेच कांगारू संघाची चिंता वाढवली आहे. उनाडकटला बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत खेळण्याची संधी मिळाली.

जिथे त्याने तीन विकेट घेतल्या होत्या. दिल्लीविरुद्ध उनाडकटच्या या कामगिरीने निवडकर्त्यांना नक्कीच प्रभावित केले असेल.सौराष्ट्रच्या कर्णधाराने दिल्लीविरुद्ध सुरू असलेल्या रणजी ट्रॉफीच्या पहिल्या सामन्यात ध्रुव शोरे, वैभव रावल आणि यश धुल यांना सलग तीन चेंडूंवर बाद करून रणजी ट्रॉफीचा इतिहास रचला. पहिल्याच षटकात हॅट्रिक घेणारा तो पहिला गोलंदाज ठरला.

या सामन्यात दिल्लीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. उनाडकटने आतापर्यंत १२ षटकांत ३९ धावा देत ८ बळी घेतले आहेत. दिल्लीच्या पाचव्या फलंदाजाला खातेही उघडता आले नाही. ५३ धावांवर आठ विकेट पडल्यानंतर हृतिक शोकीन आणि शिवांक वशिष्ठ यांनी डाव सांभाळला. गेल्या मोसमातील उपविजेता सौराष्ट्र या मोसमात आतापर्यंत तीन सामने खेळला असून १२ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

### नवव्या विकेटसाठी 80 धावांची भागीदारी

**हृतिक शोकीन आणि शिवांकने नव्या विकेटसाठी ८० धावा जोडून धावसंख्या १०० धावांच्या पुढे नेली. शिवांक ६८ चेंडूत ३८ धावा करून उनाडकटचा बळी ठरला. पुढच्याच चेंडूवर उनाडकटने कुलदीप यादवला शून्य धावांवर बाद करून दिल्ली संघाला बरोबरीत रोखले. ३५ षटकांत १३३ धावा करून संपूर्ण संघ ऑलआऊट झाला. विकेट पडण्याच्या दरम्यान हृतिक शोकीनने चांगली खेळी साकारली. त्याने ९० चेंडूत ६८ धावा केल्यानंतर तो नाबाद राहिला. या खेळीत त्याने ९ चौकार आणि ३ षटकार लगावले.**